INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# शिक्षण प्रकियेत शिक्षण सिद्धांताचे महत्त्व

**श्री. संजय संतराम जावळे**

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** http://doi-ds.org/doilink/05.2021-77925648/IRJHIS2105017

**प्रास्ताविक :**

शिक्षणात मानसशास्त्राची महत्वपूर्ण भूमिका आहे. मानसशास्त्राशिवाय आपण शिक्षणाचे लक्ष प्राप्तच करू शकत नाहीत. यामध्ये विद्यार्थ्यांची रूचि, क्षमता तथा अभिव्यक्तिच्या प्रभावाचा अभ्यास करून त्या आधारावर विभिन्न प्रकारचे 'शिक्षण सिद्धांत' प्रतिपादित केलेले आहेत.

आपण या ठिकाणी या सिद्धांतांचा उल्लेख करत आहोत परंतु आपणांस हे चांगल्या प्रकारे माहित असावे कि, शिक्षणाचे अंतिम उद्‌देश्य विद्यार्थ्यांना शिक्षित करून त्यांना नविन अध्ययन अनुभवातून नविन संकल्पना शिकवणे हा असावा.

विद्यार्थ्यांना नविन विषय वस्तू शिकवण्यासाठी थॉर्नडाइक यांच्या 'प्रयत्न व प्रमाद' हा सिद्धांत महत्वपूर्ण मानला जातो.

**शिक्षणाचे सिद्धांत :**

**टैवर्सच्या अनुसार** :– ''शिक्षण सिद्धांतांमध्ये अनेक तर्क वाक्यांचा एक समुह असतो. ज्यामध्ये एका दिशेला शिक्षणाचे परिणाम तर दुसऱ्या दिशेला विद्यार्थ्यांच्या विशेषतांचे पारस्परिक संबंधांना स्पष्ट केल्या जाते.''

**ध्रुवनर यांच्या नुसार** :– ''शिक्षण सिद्धांत उपचारात्मक असतात.''

**शिक्षण सिद्धांतांची आवश्यकता व महत्व :–**

१. शिक्षणाचे सिद्धांत हे शिक्षण तथा अधिगम (Learning) यांच्यातील संबंध स्पष्ट करतात.
२. शिक्षणाचे सिद्धांत हे प्रभावशाली शिक्षणाकडे ध्यान केंद्रित करतात.
३. यामध्ये अनुभव तथा परंपराना स्थान दिले जाते.
४. यांमध्ये शिक्षण क्षेत्रांत संशोधन आणि प्रयोग करण्यासाठी नविन विस्तिरणता प्रस्तुत केल्या जाते.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळात शिक्षण क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल झालेले आहेत. या बदलांनाच स्पर्धेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या स्पर्धेत टिकायचे असेल तर शिक्षक व विद्यार्थी यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावणे आवश्यक आहे.

कारण शिक्षणाचे सिद्धांत हे उपचारात्मक असतात. शिक्षण तथा अधिगम (Learning) यांच्यातील संबंध स्पष्ट करतात. यामध्ये अध्ययन अनुभवांना महत्वाचे स्थान दिल्या जाते. शिक्षणाच्या क्षेत्रांत संशोधन व नवनविन प्रयोग करण्यासाठी अनुभव तथा परस्परांना महत्वाचे स्थान दिल्या जाते.

**शिक्षण सिद्धांताचे प्रकार :—**

१. स्वयं करण्याचा सिद्धांत.

२. प्रेरणा व रूचिचा सिद्धांत.

३. निश्चित उद्‌देश्यांचा सिद्धांत.

४. नियोजनाचा सिद्धांत.

५. निवड व व्यक्तिगत भिन्नतेचा सिद्धांत.

६. लोकतंत्रीय व्यवहाराचा सिद्धांत.

७. जीवनाशी संबंध स्थापित करण्याचा सिद्धांत.

८. आवृत्तिचा सिद्धांत.

९. निर्मिती व मनोरंजनाचा सिद्धांत.

१०. विभाजन व अनुभवाचा सिद्धांत.

११. मानसिक तयारीचा सिद्धांत.

१२. स्वतंत्रता तथा सहसम्बद्धताचा सिद्धांत.

१३. प्रभावशाली व्यूह रचनेचा सिद्धांत.

१४. अनुकूल वातावरण तथा उचित नियंत्रणाचा सिद्धांत.

१५. उपचारात्मक नियंत्रणाचा सिद्धांत.

१६. क्रियांचा सिद्धांत.

१७. विभक्तिकरणचा सिद्धांत.

**१. स्वयं करण्याचा सिद्धांत :—**

विकासाचा आधार स्वक्रिया आहे. बालकाच्या शरीर आणि मस्तिक यांना क्रियाशील बनवून त्यास योग्य प्रकारे शिकवता येते.

**२. प्रेरणाचा सिद्धांत :—**

हा सिद्धांत बालकांमध्ये रूचि उत्पन्न करू शकतो. प्रेरणेमुळे बालक ताबडतोब पाठ्यघटक शिकू शकतो.

**३. निश्चित उद्‌देश्यांचा सिद्धांत :—**

मनुष्य जे कार्य करतो त्याचा काहीना काही तरी उद्‌देश्य असतो. उद्‌देश्याविना कार्य सिद्धि होऊ शकत नाही. शिक्षणात प्रत्येक पाठ्यघटकाचे निश्चित उद्‌देश्य असतात. शिक्षकास कोणताही पाठ्यघटक शिकवण्याआधी त्या उद्‌देश्यांचे ज्ञान होणे आवश्यक आहे.

**४. नियोजनाचा सिद्धांत :–**

एक यशस्वी शिक्षक तोच असतो जो वर्गात जाण्याआधी पुर्वनियोजन तयार करतो. ज्यामुळे त्यास काय शिकवायचे याचे भान असते. अध्यापन करतांना प्रत्येक शिक्षकास नियोजन करणे क्रमप्राप्त ठरते. ज्यामुळे क्रमबध्दता समजण्यास शिक्षकास सोपे जाते.

**५. निवड सिद्धांत :–**

शिक्षण प्रक्रियेमध्ये केवळ त्याच तथ्यांची निवड केली पाहिजे जी आवश्यक आहे. एक यशस्वी शिक्षक सरळ तथा कठिण विषयांचे त्यांच्या काठिण्य पातळीनुसार त्यांचा क्रम निर्धारित करत असतो. त्या प्रमाणे विद्यार्थांसमोर प्रस्तुतिकरण करत असतो.

**६. प्रभावशाली व्यूहरचनेचा सिद्धांत :–**

शिक्षकांस हे माहित पाहिजे की शिकवण्याआधी अत्यंत सावधानीपूर्वक व्यूहरचना तयार करून निवड, निर्माण आणि उपयोग यांचा यथोचित विचार करावा.

**७. अनुकूल वातावरण तथा उचित नियंत्रणाचा सिद्धांत :–**

हे प्रभावशाली अधिगम (Learning) हेतु आवश्यक वर्ग स्वच्छता तथ्य आहे. एक चांगला शिक्षक वर्ग स्वच्छता, प्रकाशयोजना इ. बाबत योग्य लक्ष पुरवतो.

**८. उपचारात्मक नियंत्रणाचा सिद्धांत :–**

शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या कमतरता तथा त्रुटींचा शोध घेऊन उपचार करत असतो.

**९. क्रिया सिद्धांत :–**

फ्रोबेल यांच्या नुसार 'कार्य करून शिकने' Learning ची सर्वोच्च विधि आहे.

**१०. विभक्तिकरणाचा सिद्धांत :–**

प्रभावशाली शिक्षणाचा हेतु विषयांस वेगवेगळ्या घटकांमध्ये विभागणी करावी हा आहे. जेणे करून सर्व घटकांस योग्य न्याय मिळेल.

**शिक्षणाचे मानसशास्त्रीय सिद्धांत :–**

आजची शिक्षण व्यवस्था बालकेंद्रित आहे. ही मानसशास्त्राची देण आहे. याचे तात्पर्य बालकाची योग्यता, क्षमता, अभिरूचि, मानसिकता स्तर, तसेच त्यांच्या वयोगटानुसार शिक्षण प्राप्त करणे याचे खालील प्रमाणे सिद्धांत आहेत.

१. अभिप्रेरणा तथा रूचिचा सिद्धांत.

२. अभ्यास व रूचिचा सिद्धांत.

३. तत्परतेचा सिद्धांत.

४. परिवर्तन, विश्रांती, तथा मनोरंजनाचा सिद्धांत.

५. प्रतिपुष्टी तथ पुनर्बलनचा सिद्धांत.

६. ज्ञानेंद्रिय शिक्षणाचा सिद्धांत.

७. स्वाधिगमचा सिद्धांत.

८. समुह गतिशास्त्रचा सिद्धांत.

९. स्वअभिव्यक्ती तथा सृजनात्मकतेचा सिद्धांत.

१०. सहानुभूतिचा सिद्धांत.

११. सहयोगाचा सिद्धांत.

१२. उद्दिपनाचा सिद्धांत.

१३. उपचारात्मक शिक्षणाचा सिद्धांत.

**समारोप :–**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षण प्रक्रियेत शिक्षण सिद्धांतांचे अनन्य साधारण महत्व आहे. शिक्षणाचा अंतिम उद्देश्य विद्यार्थ्यांना शिक्षित करून त्यांना नविन अध्ययन अनुभवातुन नविन संकल्पना शिकवणे हा असतो.

त्यासाठी विविध मानसशास्त्रज्ञांनी महत्वपूर्ण सिद्धांत दिलेले आहेत. त्यापैकी 'चुका व शिका' किंवा 'प्रयत्न व चुका' हा थॉर्नडाईकचा सिद्धांत महत्वपूर्ण मानला जातो.

तसेच शिक्षण सिद्धांतामध्ये अनेक तर्क वाक्यांचा एक समुह असतो. ज्यामध्ये एका दिशेला शिक्षणाचे परिणाम तर दुसऱ्या दिशेला विद्यार्थ्यांच्या विशेषतांचे पारस्पारिक संबंध स्पष्ट केल्या जाते. शिक्षणाचे सिद्धांत हे उपचारात्मक असतात. शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन व नवनविन प्रयोग करण्यासाठी अनुभव तथा परस्परांना महत्वाचे स्थान दिल्या जाते.

शिक्षणाचे सिद्धांत हे प्रभावशाली शिक्षणाकडे ध्यान केंद्रित करतात. या मध्ये अनुभव तथा परस्परांना महत्वाचे स्थान दिल्या जाते.

फ्रोबेल यांच्या म्हणण्यानुसार 'कार्य करून शिकणे' 'Learning' ची सर्वोच्च विधि आहे. तर टैवर्सच्या मते शिक्षण सिद्धांतामध्ये अनेक तर्कवाक्यांचा एक समुह असतो. ज्यामध्ये परिणाम व विद्यार्थ्यांच्या विशेषतांचे पारस्पारिक संबंध असतात.

**संदर्भ सूची :–**

१. चौबे एस. पी., शिक्षण सिद्धांत की रूपरेखा, इन्डियाना युनिवर्सिटी, यु. एस. ए.

२. डॉ. शर्मा ए. शिक्षण अधिगम के सिद्धांत, नायक पब्लिकेशन, दिल्ली

३. डॉ. गुप्ता एस. पी. व डॉ. गुप्ता ए., 'अधिगम और शिक्षण', शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद.

४. डॉ. पाठक आर., डॉ. राठौर एस. पी., सक्सेना अमित, शिक्षण अधिगम के सिद्धांत, ठाकुर पब्लिकेशन प्रा. लि.

५. डॉ. जोशी बी. आर. शिक्षणशास्त्र, सामाजिक शास्त्रांमधील संज्ञा–सिद्धांतांचा स्पष्टीकरणात्मक कोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे